


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३४१ वा | शनिवार दि ११ एप्रिल २०२६ | पृष्ठ ८ | किमंत ३ रुपये

## मी लपूनछपून बैठका घेत नाही, माझं सगळं उघड काम असतं, ऑपरेशन टायगरच्या चर्चेवर शिंदेंची प्रतिक्रिया

**वृत्तसंस्था/ सातारा**

माझी कुणाशीही बैठक झालेली नाही. कुठल्याही खासदारासोबत बैठक झालेली नाही, हे मी सकाळीच स्पष्टपणे सांगितलेलं होतं. खरंतर मी लपून छपून कुठल्या बैठका घेतच नाही. माझं सगळं उघड काम असतं. त्यामुळे उबाठाच्या खासदारांबरोबर कुठलीही बैठक झालेली नाही आणि मी माझ्या खासदारांनाच ऑनलाईन भेटतोङ्क्ष, अशा स्पष्ट शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऑपरेशन टायगरफ्च्या चर्चेचं वृत्त फेटाळून लावलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे त्यांच्या दरे (ता. महाबळेश्वर) गावी आले असताना एकनाथ शिंदे यांची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदारांसोबत मध्यरात्री ठाण्यात बैठक झाल्याचे वृत्त मुंबईतील एका वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले. त्यानंतर राजकीय वर्तुळात ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू झाली. त्यावर एकनाथ शिंदे यांनी बैठकीचे वृत्त पूर्णपणे निराधार असल्याचे सांगत ऑपरेशन टायगरफ्ची चर्चा निरर्थक असल्याचे स्पष्ट केले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दरे येथे माध्यमांशी बोलताना ङ्कऑपरेशन टायगरफ्ची चर्चा निरर्थक असल्याचे सांगत माध्यमांमधून केले जात असलेले सर्व दावे फेटाळून लावले. बातमी देताना त्याची पूर्ण शहानिशा केली पाहिजे. माझी कोणत्याही खासदारांसोबत बैठक झालेली नाही. मी लपून-छपून कुठल्याही बैठका घेत नाही. माझे सगळे उघड काम असते, असा स्पष्ट खुलासा त्यांनी केला. आम्ही उबाठाच्या खासदारांना भेटलो अशा बातम्या चालवल्या जात आहेत. परंतु, त्यात कोणतेही तथ्य नाही. ती केवळ



अफवा आहे. त्यामुळे सनसनाटी निर्माण करण्यासाठी अशा पद्धतीच्या बातम्या देणे माध्यमांनी टाळले पाहिजे. शहानिशा करून खात्री करूनच माध्यमांनी वस्तुनिष्ठ बातम्या दिल्या पाहिजेतङ्क्ष, असा सल्लाही एकनाथ शिंदे यांनी दिला. दरम्यान, ठाकरे गटाचे खासदार एकनाथ शिंदेंना भेटल्याच्या वृत्तावर खासदार अरविंद सावंत यांनीदेखील संताप व्यक्त केला. मी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा शिवसैनिक आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे ज्या शिवसेनेचं नेतृत्व करतात त्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा शिवसैनिक आहे. मला उभा चिरला तरी मातोश्रीसोबत प्रतारणा होणार नाही. पण उद्धव ठाकरेंना सोडणार नाही, अशी भूमिका अरविंद सावंत यांनी मांडली.

---

## शिंदे-फडणवीस हे सख्ख्या भावासारखे; फोडाफोडी करणे आमच्या रक्तात नाही, -बावनकुळे

**वृत्तसंस्था/ अकोला**

महाराष्ट्राच्या राजकारणात सातत्याने ऑपरेशन टायगरचा उल्लेख केला जातोय. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून ऑपरेशन टायगर राबवून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदारांना आपल्या पक्षात प्रवेश देण्यासाठी हालचाली सुरु असल्याच्या चर्चा पुन्हा सुरु झाल्या आहेत. पण या वृत्ताचं खंडन ठाकरे गटाकडून करण्यात आलं आहे. तर दुसकीकडे भाजप नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीदेखील याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. तसेच महायुतीत शिवसेना आणि भाजप यांच्यात मतभेद असल्याच्या चर्चा सातत्याने होत असतात. सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीवरुन या चर्चांना फोडणी मिळाली होती. पण चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिंदे-फडणवीस हे सख्ख्या भावासारखे एकत्रपणे काम करत असल्याचं म्हटलं आहे. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस हे दोघेही सख्ख्या भावासारखे अत्यंत मजबूतीने महाराष्ट्र सरकारमध्ये काम करत



आहेत. अत्यंत विश्वासाने आमचं सरकार काम करत आहे. फोडाफोडी करणे आमच्या रक्तात नाही. आम्ही महायुतीचा धर्म पाळणारे लोकं आहोत. खरंतर हा धर्म ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी तोडला. हा धर्म खासदार संजय राऊत यांनी तोडला, अशी टीका चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. आमच्या महायुतीसोबत फारकत घेऊन उद्धव ठाकरे हे काँग्रेसकडे गेले. उद्धव ठाकरेंचं सरकार असताना ज्या पद्धतीचं अविश्वासाचं वातावरण उद्धव ठाकरे सरकारमध्ये झालं होतं, त्यामुळे त्यांचे आमदार निघून गेले. तसं देवेंद्र फडणवीस यांचं सरकार नाही. तसं एकनाथ शिंदे यांचं सरकार नाही. २१७ आमदारांचं प्रचंड मजबुतीचं सरकार महाराष्ट्रात आहे, जे एक दिलाने काम करत आहे, असा दावा चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. कोणत्याही पक्षाचा आमदार कुणाला भेटला तर त्यात काहीही राजकारण नसतं. अनेकवेळा खासदार आपल्या मतदारसंघांची कामे करण्यासाठी सरकारकडे येतात. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे खासदार एकनाथ शिंदे किंवा देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आले असतील तर त्यांच्या मतदारसंघाच्या विकासकामांच्या विषयासाठी आले असतील. त्यावरुन त्यांच्यावर शंका घेणं चुकीचं आहे, असंदेखील मत चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडलं.

# बुलढाणा जिल्ह्यात माविम ठरतेय महिलांच्या आर्थिक उन्नतीचे इंजिन...

महिलांना केवळ चूल आणि मूल या रहाटगाड्यातून बाहेर काढून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम असलेले महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) बुलढाणा जिल्ह्यात क्रांती घडवत आहे. जिल्ह्यातील १३ तालुक्यांमध्ये १४ लोक संचालित साधन केंद्रांच्या () माध्यमातून माविमचे जाळे पसरले असून, तब्बल ४,१८५ स्वयं सहाय्य बचत गटांच्या माध्यमातून ४२,०३९ महिलांना एकजूट करण्यात आले आहे. आर्थिक सक्षमीकरणाचा भक्कम पाया : माविमच्या माध्यमातून महिलांना केवळ एकत्रच आणले नाही, तर त्यांना बँकांशी जोडून व्यवसायासाठी भांडवलही उपलब्ध करून दिले आहे. जिल्ह्यात आतापर्यंत बँकांकडून महिला बचत गटांना २९२.३४ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. विशेष अभिमानाची बाब म्हणजे, या महिलांचा कर्ज परतफेडीचा दर ९९ टक्के इतका प्रचंड असून, महिलांनी आर्थिक शिस्त आणि प्रामाणिकपणाचे उत्तम उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. हे कर्ज महिलांनी शेती, मुलांचे शिक्षण आणि विविध छोटे-मोठे उद्योग उभारण्यासाठी वापरले आहे. सन २०२५-२६ या वर्षात आतापर्यंत ४० कोटी रुपयांचे कर्ज वाटप झाले आहे. नवतेजस्विनी आणि तेजश्री योजनांचा लाभ : महिलांमधील उद्योजकता वाढीस लागावी यासाठी नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास कार्यक्रम राबविला जात आहे. तसेच, मानव विकास मिशन अंतर्गत तेजश्री फायनान्शियल सर्व्हिसेस द्वारे गरीब महिलांना अत्यंत कमी व्याजदरात लघुकर्ज उपलब्ध करून दिले जात आहे. यामुळे महिलांची खाजगी सावकारीतून सुटका झाली असून, २०१ गावांमधील ८,६९२ महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. आरोग्य आणि स्वच्छता: . सहभाग : केवळ आर्थिकच नव्हे, तर महिलांच्या आरोग्यासाठीही माविम कटिबद्ध आहे. . या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या सहकार्याने जिल्ह्यात १४ कार्यक्षेत्रात स्वच्छता आणि पाणी पुरवठा योजना राबविली जात आहे. यात शौचालय बांधणी आणि पिण्याचे शुद्ध पाणी यासाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाते. ११,२०० कुटुंबांपर्यंत पोहोचण्याचे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. याशिवाय, महिलांच्या आरोग्यासाठी तपासणी शिबिरे घेऊन त्यांना हेल्थ कार्ड देण्यात आले असून हिमोग्लोबिन, थायरॉईड आणि च्या नोंदी ठेवून आरोग्य सुधारण्यावर भर दिला जात आहे. अल्पसंख्याक महिलांचा विकास : मलकापूर शहरांमध्ये अल्पसंख्याक महिला सक्षमीकरण कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात आहे. मलकापूरमध्ये ३०,९१५ लोकसंख्येला लक्षित करून जैन, बौद्ध, मुस्लिम, पारशी व ख्रिश्चन समाजातील महिलांचे १८० बचत गट स्थापन करण्यात आले आहेत. राजमाता विक्री केंद्रे आणि सेंद्रिय शेती : बचत गटांनी तयार केलेल्या मालाला हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून राजमाता कायमस्वरूपी विक्री केंद्रे सुरू करण्यात येत आहेत. ही केंद्रे बस स्थानक व मुख्य बाजारपेठेत असल्याने महिलांच्या उत्पादनांना चांगली मागणी मिळत आहे. तसेच, घरगुती बागायतीला प्रोत्साहन देण्यासाठी बियाणे किट ( ) वाटप करून सेंद्रिय शेती आणि अन्नसुरक्षा बळकट केली जात आहे. पुरुषांचा सहभाग: माविम मित्र मंडळ : महिला सक्षमीकरण केवळ महिलांपुरते मर्यादित न ठेवता, त्यात पुरुषांचाही सहभाग वाढविण्यासाठी माविम मित्र मंडळ ही अनोखी संकल्पना राबविली जात आहे. यात लिंगसमभाव संचेतना या विषयावर पुरुषांचे प्रबोधन करून त्यांना महिला विकासात सहभागी करून घेतले जात आहे. बुलढाणा जिल्ह्यात जिल्हा समन्वय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि १४ लोक संचालित साधन केंद्रांच्या मदतीने माविम हे महिलांच्या सर्वांगीण विकासाचे एक प्रमुख केंद्र बनले आहे.

यासेरोद्दीन काझी,
जिल्हा माहिती अधिकारी, बुलढाणा





The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# राहुरीत वंचित विरुद्ध भाजपात लढत; शरद पवार गटाचा उमेदवार डमी, प्रकाश आंबेडकरांचा घणाघात...

वृत्तसंस्था/ अहिल्यानगर

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज विरोधकांवर तिखट शब्दांत हल्लाबोल केला. ही लढत वंचित आणि भाजप यांच्यातच आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार हा फक्त डमी आहे, असा थेट आरोप करत त्यांनी निवडणुकीचा रंग अधिकच चढवला. आंबेडकर म्हणाले, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीच प्राजक्ता तनपुरे यांना उमेदवारी दिली नाही. भाजपने दबाव आणला, हा केवळ दिशाभूल करणारा प्रचार आहे. याचवेळी त्यांनी सत्ताधाऱ्यांवर संशय व्यक्त करत अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणात साधी एफआयआरही दाखल झाली नाही. यात काहीतरी काळेबेरे आहे का? असा थेट सवाल उपस्थित केला. घराणेशाही वाढली तर लोकशाही संपते आणि हुकूमशाही सुरू होते, असा इशारा देत आंबेडकरांनी मतदारांना



सावध राहण्याचे आवाहन केले. तसेच मुस्लिम समाजाला १०० टक्के मतदान करण्याचे आवाहन करत त्यांनी निवडणुकीत मोठी उलथापालथ घडवण्याचा इशाराच दिला.

अशोक खरात प्रकरणावर बोलताना प्रकाश आंबेडकरांनी भाजप आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर गंभीर आरोप करत वातावरण आणखी तापवले. भोंदूगिरी आणि पारंपरिक व्यवसाय यात फरक आहे. आजच्या काळात काही जण अंधश्रद्धेच्या नावाखाली लोकांचे शोषण करत आहेत. अशा फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, असे त्यांनी ठणकावले. तसेच अशोक खरात हा नेमका कुणाचा नातेवाईक आहे, हे विखे पाटलांनी जाहीर करावे, असे थेट आव्हान देत खरात यांच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली. दरम्यान, राहुरी पोटनिवडणुकीत आता आरोप-प्रत्यारोपांची मालिकाच सुरू झाली आहे. वंचित बहुजन आघाडी आणि भाजप यांच्यात थेट संघर्षाची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. आंबेडकरांच्या या आक्रमक भूमिकेमुळे निवडणूक आणखी रंगतदार होणार, यात शंका नाही.

# काँग्रेसच्या उमेदवाराला माहिती नाही आपण बारामतीतून माघार घेतोय...

## वडेट्टीवार मीडियासमोर आले तत्पूर्वी काय-काय घडलं?

वृत्तसंस्था/बारामती

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसने राष्ट्रवादीच्या सुनेत्रा पवार यांच्याविरोधात आकाश मोरे यांना उमेदवारी दिल्याने निवडणुकीत रंगत निर्माण झाली आहे. मात्र काँग्रेसने आपला उमेदवार मागे घ्यावा, यासाठी राष्ट्रवादीकडून जोरदार प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीला काही तास बाकी असताना काँग्रेसची कोंडी झाली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस उमेदवार आकाश मोरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. पक्षनेतृत्वाचा निर्णय मला मान्य राहील. मात्र आमचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माघार घेण्याबाबत, मला अद्याप संपर्क केलेला नाही, किंवा काहीही सूचना दिलेल्या नाहीत. सपकाळ यांचा मला सकाळी फोन आला होता. आपल्याला लढायचंय असं त्यांनी सांगितलं होतं. परंतु त्यानंतर नवीन काय निर्णय आहे, त्याबाबत ते मला माहिती देतील. हर्षवर्धन सपकाळ हे राज्यात आता आमचे बॉस आहेत आणि त्यांचा निर्णय अंतिम राहील, असं मोरे यांनी स्पष्ट केलं आहे.





उमेदवारीबद्दल पुढे बोलताना आकाश मोरे म्हणाले की, लोकांमधून आपल्या उमेदवारीबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. मात्र हा प्रतिसाद सकारात्मक असताना आपल्याला लोकांच्या भावनाही जपायच्या आहेत. हे सगळं मी वरिष्ठांना कळवलेलं आहे. त्यामुळे तुम्हाला जो योग्य वाटतो तो निर्णय तुम्ही घ्या, त्या निर्णयास मी बांधिल राहीन. लोकांच्या भरपूर समस्या आहेत, त्यामुळे निवडणूक लढवावी, यासाठी मला बारामती तालुक्यातून भरपूर फोन आणि मेसेजेस येत आहेत, असा दावा आकाश मोरेंनी केला आहे. एकीकडे आपण माघार घ्यायची आहे की अर्ज कायम ठेवायचा आहे, याबाबत काँग्रेस उमेदवार आकाश मोरे यांना अद्याप पक्षाकडून अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. त्यातच काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी बारामतीच्या पोटनिवडणुकीतून काँग्रेस आपला उमेदवारी अर्ज मागे घेईल, असं मीडिसमोर येऊन जाहीरपणे सांगितलं . वडेट्टीवार यांच्या विधानाने काँग्रेसमध्ये संभ्रमाचं वातावरण निर्माण झालं आहे. काँग्रेसने बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत माघार घ्यावी, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याशी फोनवरून संवाद साधल्याचं सांगितलं जात आहे. त्यामुळे शरद पवारांच्या आवाहनाला काँग्रेस प्रतिसाद देणार का, हे काही वेळात स्पष्ट होणार आहे.

# नगरसेविकेचा ३ तासांत भाजप-काँग्रेस-भाजप प्रवास

वृत्तसंस्था/ गांधीनगर

गुजरातमध्ये एप्रिलच्या अखेरीस नगर परिषदेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भावनगरमध्ये नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. भाजपच्या माजी नगरसेविकेनं काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पण पुढच्या काही तासांत ही माजी नगरसेविका भाजपमध्ये परतली. अवघ्या काही तासांत झालेल्या या झटपट पटापट झालेल्या पक्षांतराची चर्चा संपूर्ण राज्यात सुरु आहे. नगरसेविका असूनही मला भाजपमध्ये सुरक्षित वाटत नाही. तिथे सर्वसामान्यांचं काय, असा सवाल करत सेजल गोहिल यांनी भाजपला सोडचिठ्ठी दिली. भावनगरमध्ये अवैध दारु विक्री सुरु असल्याचा विषयदेखील सेजल गोहिल यांनी उपस्थित केला. बारावी पास असलेल्या, दलित समाजातून येणाऱ्या सेजल गोहिल ३० वर्षांच्या आहेत. भावनगर नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक ३ मधून त्या २०२१ मध्ये विजयी झाल्या होत्या. दुपारच्या सुमारास सेजल गोहिल यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यानंतर पुढच्या ३ तासांत त्या भाजप मध्ये परतल्या. काँग्रेस च्या काही नेत्यांनी माझ्या मनात गैरसमज निर्माण केला, माझी दिशाभूल केली, असा दावा त्यांनी भाजपमध्ये परतताना केला. काँग्रेसच्या काही नेत्यांचं ऐकून मी भाजप सोडला.



माझ्या हातून चूक घडली. काँग्रेस नेत्यांच्या प्रभावाखाली येऊन मी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला होता. पण मला माझ्या चुकीची जाणीव झाली. त्यामुळे मी घरवापसीचा निर्णय घेतला, असं गोहिल यांनी सांगितलं. विशेष म्हणजे सोशल मीडियावर सेजल गोहिल यांच्याबद्दल एक वेगळाच दावा करण्यात आला. ईडीची नोटिस आल्यानं गोहिल भाजपमध्ये परतल्याचे दावे काही अकाऊंट्सवरुन सोशल मीडियावर करण्यात आले. पण प्रत्यक्षात गोहिल यांना ईडीची कोणतीही नोटिस आलेली नसल्याचं समजतं. सेजल गोहिल यांच्या पक्षांतराबद्दल काँग्रेस नेत्यांना विचारणा करण्यात आली. त्यावर आमच्याकडून कोणीही गोहिल यांची दिशाभूल केली नसल्याचं त्यांनी सांगितलं. काँग्रेसच्या कोणत्या नेत्यांनी तुमची दिशाभूल केली, असा प्रश्न गोहिल यांना विचारण्यात आला. तेव्हा त्या नेत्यांची नावं माहीत नसल्याचं अजब उत्तर गोहिल यांनी दिलं. गुजरातच्या राजकारणात गोहिल यांच्या पक्षांतराची सध्या जोरदार चर्चा आहे.

# सलगीतून धर्मांतराचा डाव; विशिष्ट धर्माच्या तरुण-तरुणींकडून प्रयत्न, SIT कडून 'एचआर'ची चौकशी

**नाशिक/वृत्तसंस्था**




नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत आठ तरुणींसोबत लैंगिक जवळीक साधून एकीवर अत्याचार करीत तिच्यासह एका तरुणाचे धर्मांतराचा प्रयत्न झाल्याच्या प्रकरणात विशिष्ट धर्मीय तरुण-तरुणींनी धर्मांतराचा 'मास्टरगेम' खेळल्याची धक्कादायक माहिती आहे.नाशिक शहरातील देवळाली कॅम्प पोलिसांत एक आणि मुंबई नाका पोलिसांत आठ असे नऊ गुन्हे नोंद आहेत. त्यामध्ये आठ महिला व एक पुरुष फिर्यादी असून, आठपैकी दोन महिला विवाहित, तर सहा तरुणी अविवाहित आहेत. नऊपैकी एका गुन्ह्यात लैंगिक अत्याचारासह धर्मांतराचा प्रयत्न झाला असून, दुसऱ्या गुन्ह्यात एका तरुणाचेही धर्मांतर करण्याचा प्रयत्न झाला आहे.उर्वरित सहा गुन्ह्यांत पीडितांसोबत लैंगिक जवळीक साधून धार्मिक भावना दुखविण्यात आल्या असून, या गुन्ह्यांत सहा संशयितांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. हे संशयित एसआयटीच्या कोठडीत असून, एक तरुणीचा शोध सुरू आहे. दरम्यान, संशयितांवर गुन्हे नोंद होताच कंपनीतील 'एचआर' आश्विनी अशोक चैनानी (वय ५१ वर्ष, रा. फ्लॅट नं. २, प्रकाश अपार्टमेंट, लुला नगर, पुणे) पसार झाली होती. 'एसआयटी'ने तिला गुन्ह्याच्या तपासाकामी ताब्यात घेतले होते. चौकशीनंतर तिला कायदेशीर नोटीस देऊन सोडण्यात आले. देवळाली कॅम्प पोलिसांत पहिला गुन्हा २५ मार्च २०२६ रोजी दाखल झाला. कुटुंबीयांनी पीडितेला विश्वासात घेत पोलिसांत नेल्यानंतर फिर्याद नोंद होताच आयुक्तालयाने गंभीर दखल घेत कंपनीत धडक दिली. कंपनीतील तरुणींना विश्वासात घेतल्यानंतर धर्मांतराच्या प्रयत्नासह लैंगिक छळाचे बिंग फुटले. त्यातून हा संघटित गुन्हेगारीचा प्रकार असल्याचे उघड झाले. एकाच परिसरात राहणाऱ्या संशयितांनी जाणीवपूर्वक हा प्रकार केल्याचे तपासात समोर आले.२३ वर्षीय पीडितेवर संशयिताने एका टेकडीसह त्र्यंबकेश्वर रस्त्यावरील एका रिसॉर्टमध्ये लैंगिक अत्याचार केले. यासह संशयित दोघांनी पीडितेच्या धार्मिक भावना दुखवल्या. तर संशयित तरुण विवाहित असूनही पीडितेसोबत खोटे बोलून तिला लग्नाचे वचन देत शारीरिक संबंध ठेवले. दुसऱ्या संशयिताने पीडितेला कंपनीच्या लॉबी, पॅन्ट्रीमध्ये पकडून लैंगिक जवळीक साधण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.पहिल्या गुन्ह्यातील पीडितेने अनेकदा महिनाभरासाठी उपवास पकडले होते. हिंदू तरुणींनी तिला जेवणासाठी बोलविल्यानंतर पीडितेने टाळले होते. संशयित दानिश याचे लग्न झाल्याबाबतही पीडितेला सांगितले होते.

धक्कादायक म्हणजे, पीडितेने गतवर्षी 'लिप्स्टिक' लावणेही सोडले होते. तिच्या एका हिंदू 'टीम लीडर' तरुणीनेही समजूत काढून संशयितांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला होता. मात्र, संशयितांनी पगडा टाकलेल्या पीडितेला संशयिताचे लग्न झाले आहे, यावर विश्वासच बसत नव्हता.संशयित अविवाहित असल्याचा दावा करून हिंदू व त्यांच्या धर्मातील विविध मुद्द्यांवर चर्चा करून 'हे असं करायचं, ते तसं करायचं', असे सांगण्याचा प्रयत्न करायचे. त्यामध्ये दोन तरुणींचाही समावेश होता. तरुणींसोबत चर्चा करून त्यांना विश्वासात घेत 'तुला विशिष्ट पोषाख छान दिसेल. आपण एकदा ट्राय करू', असे संशयित म्हणायचे. वेळप्रसंगी संशयित तरुण-तरुणींनी जबरदस्तीही केल्याचे सूत्रांनी सांगितले. या प्रकारामुळे काही तरुणींनी नोकरी सोडल्याचेही समजते. यासह एका हिंदू तरुणीसह एका तरुणाला कंपनीच्या टेरेसवर आक्षेपार्ह स्थितीत इतर कर्मचाऱ्यांनी पकडले होते. 'सीसीटीव्ही' तही हा प्रकार चित्रित झाला होता. मात्र, संशयित तरुणाने वरिष्ठ सहकाऱ्यांच्या मदतीने त्या प्रकरणावर पडदा टाकला होता.

एका तंत्रज्ञान कंपनीत ज्या प्रकारे दबाव आणून धर्मांतर आणि लैंगिक शोषण केले, हे फारच धक्कादायक आहे. नाशिक पोलिसांनी अतिशय वेगाने कारवाई करून या प्रकरणाचा पर्दाफाश केला, त्याबाबत पोलिसांचे कौतुक आहे. या प्रकरणात सर्व संशयितांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

# वडिलांच्या दुसऱ्या लग्नाच्याच दिवशी लेकरानं बापाला संपवलं

**जालना/वृत्तसंस्था**

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात एक अत्यंत मोठी आणि हृदय पिळवटून टाकणारी घटना उघडकीस आली आहे. पोटच्या मुलानेच आपल्या सख्ख्या वडिलांची कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेनं संपूर्ण परिसरात भीतीचं वातावरण आणि खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज गुरुवारी रोजी सकाळी 5 वाजेच्या सुमारास अंबड तालुक्यातील रुई गावात सकाळच्या सुमारास दिलीप राजगुरू (वय ४५) यांचं पार्थिव त्यांच्या राहत्या घराजवळ रक्ताच्या थारोळ्यात आढळून आलं. ही बाब ग्रामस्थांच्या निदर्शनास येताच त्यांनी तत्काळ तीर्थपुरी पोलीस ठाण्याला माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा करत तपासाला सुरुवात केली. प्राथमिक तपासात दिलीप राजगुरू यांच्या डोक्यावर आणि शरीरावर कुऱ्हाडीचे गंभीर घाव असल्याचं आढळून आलं, त्यामुळे ही हत्या असल्याचं स्पष्ट झालं.या प्रकरणाचा सखोल तपास सुरु केल्यानंतर पोलिसांना धक्कादायक माहिती समोर आली. दिलीप राजगुरू यांचा स्वतःचा मुलगा विलास राजगुरू (वय १९) याने आपल्या एका साथीदाराच्या मदतीने ही हत्या केल्याचं उघड झालं. पोलिसांनी संशयाच्या आधारे विलासला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. या हत्येमागील कारण ऐकून सर्वांनाच धक्का बसला आहे. विलासच्या आईचं म्हणजेच दिलीप राजगुरू यांच्या पत्नीचं काही वर्षांपूर्वी निधन झालं होतं. त्यानंतर ते एकटेच राहत होते. दरम्यान, त्यांनी दुसरं लग्न करण्याचा निर्णय घेतला होता आणि विशेष म्हणजे, त्यांच्या विवाहाचा दिवस हा घटनेच्याच दिवशी ठरलेला होता.


# एका भावाचा मृत्यू होईल; 'दैवी शक्ती'च्या नावे खरातचा शेतकऱ्याला गंडा, 16.5 एकर जमिन फुकटात हडपली

**नाशिक/वृत्तसंस्था**

'दैवी शक्ती'चा धाक दाखवून जमीन विकायला भाग पाडल्याचा आरोप असलेल्या भोंदू अशोक खरातविरोधात सिन्नर तालुक्यातील शेतकऱ्याने तब्बल २२ वर्षांनंतर तक्रार करण्याचे धाडस दाखविले. अखेर मिरगाव शिवारातील १६.५० एकर जमीन फसवणुकीने हडपल्याची फिर्याद त्यांनी गुरुवारी (दि.९) सिन्नर पोलिसांत दिली. अशोक व त्याची पत्नी कल्पना खरातविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कुंदेवाडी (ता. सिन्नर) येथील शिवराम एकनाथ माळी आणि त्यांच्या भावांनी १९९७ साली मिरगाव शिवारात सुमारे १५ लाखांना १६.५० एकर जमीन खरेदी केली होती. शेती खरेदी करत असतानाच २००३ मध्ये संशयित खरात त्यांच्या शेतात आला. मंत्रोच्चार करत पूजाविधी करून त्याने माळी कुटुंबाचा विश्वास जिंकला. यानंतर 'तुमच्या कुटुंबावर संकट आहे, एका भावाचा मृत्यू होऊ शकतो', अशी भीती दाखवत त्याने जमीन विकण्याचा सल्ला दिला.या भीतीच्या छायेत आणि संमोहनाच्या प्रभावाखाली फिर्यादी शेतकऱ्याकडून २००४ मध्ये सिन्नर दुय्यम निबंधक कार्यालयात सह्या घेऊन कुठलाही मोबदला न देता जमीन स्वतःच्या नावे करून घेतल्याचा खरातवर आरोप आहे. मोबदल्याबाबत विचारणा केल्यावर त्याने 'माझ्याकडे दैवी शक्ती आहे, विरोध केला तर जादूटोणा करून कुटुंबाचा नाश करीन', अशी धमकी दिली. संशयिताचे मोठ्या लोकांशी संबंध असल्याच्या भीतीने माळी कुटुंबाने तब्बल २२ वर्षे मौन बाळगले.दरम्यान, अशोक खरात प्रकरणातील सुनावणीत त्याने एका महिलेला अपत्यप्राप्तीचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याचे सांगण्यात आले. त्यासाठी त्याने दैवी व अघोरी उपचार केले. त्यामुळे त्याच्यावर गर्भलिंग निवड प्रतिबंध कायद्याचे कलम लावा, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केली. 'एसआयटी'च्या प्रमुख तेजस्वी सातपुते यांच्याकडे ही मागणी करण्यात आलीमहिलांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या संशयित अशोक खरातचे कारनामे उघड करणाऱ्या 'ऑफिस बॉय'च्या फिर्यादीनुसार दाखल गुन्ह्यात खरातला न्यायालयाने गुरुवारी (दि.९) पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. आता खरात प्रकरणाच्या मूळ गुन्ह्याची चौकशी सुरू झाली असून, पुत्रप्राप्तीचा दावा आणि आर्थिक शोषणाचा तपासही विशेष तपास पथकाने (एसआयटी)ने हाती घेतला आहे. विशेष म्हणजे, खरातला चिंचोक्यांचे नकली खडे तयार करून देणाऱ्या स्थानिक व्यावसायिकाच्या मागेही चौकशीचा ससेमिरा सुरू झाला आहे.

# सागर ठाकरेने टीशर्टने पोलीस कोठडीत जीव दिला, कुटुंबाला भरपाई मिळणार

**मुंबई/वृत्तसंस्था**






'आरोपी पोलिस कोठडीत असताना त्याची सुरक्षितता व त्याचे संरक्षण, याची जबाबदारी ही संबंधित पोलिसांवर असते. सागर ठाकरे या तरुणाला सुरक्षित कोठडीत ठेवण्यात संबंधित पोलिसांना अपयश आले. सरकारी सेवकाच्या हलगर्जीने नागरिकाच्या मूलभूत हक्काचा अशाप्रकारे भंग झाल्यास राज्य सरकारवर जबाबदारी असते', असे निरीक्षण नोंदवत राज्य मानवाधिकार आयोगाने सागरच्या कुटुबीयांना एक लाख रुपयांची भरपाई देण्याचे निर्देश दिले आहेत.आदेशाची प्रत मिळाल्यापासून आठ आठवड्यांत सागरच्या कुटुंबीयांना एक लाखाची भरपाई द्यावी. अन्यथा ती रक्कम प्रत्यक्षात दिली जाईपर्यंत त्या रकमेवर वार्षिक आठ टक्के दराने सरळ व्याज लागू होईल. या आदेशाची प्रत आयोगाच्या सचिवांनी गृह विभागाचे संबंधित नोडल अधिकारी, राज्याचे अतिरिक्त पोलिस महासंचालक (नागरी हक्कांचे रक्षण) आणि पोलिस विभागाचे नोडल अधिकारी यांना पाठवावी', असेही आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती ए. एम. बदर व सदस्य संजय कुमार यांच्या खंडपीठाने नुकत्याच दिलेल्या आदेशात म्हटले आहे.सागरने अमरावतीमधील राजापेठ पोलिस ठाण्यातील कोठडीत असताना १९ ऑगस्ट २०२१ रोजी जीव दिल्याची माहिती आयोगाला कळवण्यात आली होती. 'सागरला पोक्सो गुन्ह्यात अटक झाली होती. त्याच्या प्रेमसंबंधाला दोन्ही बाजूंनी विरोध होता. अशा कौटुंबिक व वैयक्तिक कारणांमुळे मानसिक तणावाखाली त्याने पूर्वीही आयुष्य संपवण्याचा प्रयत्न केला होता. कोठडीत असताना त्याने जीवनयात्रा संपवल्याचे सीसीटीव्ही दृश्यांतून स्पष्ट होते', असा अहवाल अमरावती सीआयडी उपपोलिस अधीक्षकांनी दिला.तर, कोठडीत सोबत असलेला अन्य आरोपी आणि अन्य संबंधित अनेक साक्षीदारांचे जबाब नोंदवून न्यायदंडाधिकाऱ्यांनी आपला अहवाल दिला. 'पहाटे उठलो तेव्हा सागर जागा होता. नंतर पोलिसाने मला उठवून सांगितले की, तुझ्या लाल शर्टचा वापर करून सागरने जीव दिला' असे सोबतच्या आरोपीने सांगितले. सीसीटीव्ही दृश्ये आहेत. कुटुंबीयांनीही अत्याचारासारखा संशय व्यक्त केला नाही. त्यामुळे हा मृत्यू संशयास्पद नसून जीव दिल्याने झालेला आहे', असा निष्कर्ष न्यायदंडाधिकाऱ्यांनी चौकशीअंती अहवालात नोंदवला.अखेरीस, 'कोठडीत असताना आरोपीची सुरक्षितता व त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधित पोलिसांवर असते. या प्रकरणात संबंधित सर्व पाच पोलिसांना आपले कर्तव्य पार पाडण्यात अपयश आले', असे निरीक्षण आयोगाने आपल्या आदेशात नोंदवले.

# लखनौचा सलग दुसरा विजय, केकेआरचा 3 विकेटने पराभव, चौधरीचे वादळी अर्धशतक




**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएल २०२६ मधील १५ वा सामना केकेआर वि. लखनौ सुपर जायंट्स यांच्यात पार पडला. शेवटच्या ओव्हरपर्यंत रंगलेल्या सामन्यामध्ये लखनौने विजय मिळवला. लखनौच्या मुकुल चौधरी या युवा खेळाडूने एकट्याच्या दमावर सामना फिरवला. नाबाद ५४ धावांची अर्धशतकी खेळी करत लखनौला दुसरा विजय मिळवून दिला. लखनौचे प्रमुख फलंदाज माघारी परतले होते, केकआर हा सामना जवळपास जिंकल्यात जमा होती. पण मुकूल चौधरीने एकट्याने संपूर्ण सामना फिरवला. शेवटच्या ओव्हरमध्ये १४ धावांची गरज होती, पठ्ठ्याने कसलाही दबाव न घेता विजय मिळवला. या विजयासह लखनौने चार गुण मिळवत पॉइंट टेबमध्ये थेट पाचव्या स्थानी झेप घेतली आहे. केकेआरला आपला पहिला विजय अद्यापही मिळवता आला नाही.केकेआरने २० ओव्हरमध्ये १८१-४ धावा केल्या होत्या. या धावांचा लखनौ संघाने यशस्वीपणे पाठलाग केला आहे. लखनौकडून आयुष बदोनी ३४ चेंडूत ५४ धावा आणि मुकूल चौधरी याने २७ चेंडूत नाबाद ५४ धावा या दोघांनी अर्धशतकी खेळी केली. इतर कोणत्याही फलंदाजाला २५ धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. निकोलस पूरन १३ धावा, ऋषभ पंत १० धावा, अब्दुल समद ३ धावा हे स्वस्तात परतले होते, मात्र मुकूलने सात षटकार आणि दोन चौकारांची आतषबाजी करत सामना जिंकवला. केकेआरकडून अजिंक्य रहाणे आणि फिन ऍलन ओपनिंगला आले होते. फिन याने दोन चौकार मारत दमदार सुरूवात केली होती. मात्र दुसऱ्याच ओव्हरमध्ये मोठा फटका मारण्याच्या नादात प्रिन्स यादवच्या बॉलिंगवर ९ धावांवर आऊट झाला. सीमीरेषेवर राठीने पकडलेला कॅच वादग्रस्त ठरला. त्यानंतर आलेल्या अंगकृष रघुवंशी आणि रहाणे यांनी सामन्याची सूत्रे हातात घेतली. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ५२ चेंडूत ८४ धावांची खेळी करत संघाला दबावातून बाहेर काढले.मात्र त्यानंतर लखनौच्या गोलंदाजांनी कमबॅक करत सामना खेचला. अजिंक्य रहाणे २४ चेंडूत ४१ धावांवर असताना त्याला राठीने आऊट करत ही जोडी फोडली. त्यानंतर रघुवंशीही ४५ धावांवर आऊट झाला.दोघांपाठोपाठ आलेल्या रिंकु सिंहही फार काही करू शकला नाही. त्याला आवेश खान याने ४ धावांवर बोल्ड केले. ९९-२ ला असणारी केकेआर १४ व्या ओव्हरमध्ये १११-४ अशी झाली. त्यामुळे केकेआर पूर्णपणे बॅकफूटला गेली होती. पण मैदानात आलेल्या कॅमेरॉन ग्रीन आणि रोवमन पॉवेल यांनी लखनौच्या गोलंदाजांवर आक्रमण करायला सुरूवात केली. दोघांनाही २४ चेंडू खेळले, यामध्ये ग्रीन याने ३ चौकार आणि १ षटकारासह नाबाद ३२ धावा केल्या. तर रोवमन पॉवेल याने नाबाद ३९ धावा केल्या. पॉवेलने ४ चौकार आणि २ षटकार लगावले. दोघांच्या केलेल्या ७० धावांच्या भागीदारीमुळे केकेआर १८० चा आकडा पार केला.

## फक्त 1 धावेने गुजरातचा विजय, सामन्याचा सर्वात महत्त्वाचा टर्निंग पॉइंट, दिल्लीचा पहिला पराभव

**मुंबई/वृत्तसंस्था**

दिल्ली कॅपिटल्स संघाला आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धेत गुजरात टायटन्सविरुद्ध विजयासाठी अखेरच्या दोन चेंडूंत दोन धावांची गरज होती. डेव्हिड मिलरने पाचव्या चेंडूवर कुलदीप यादवला एकेरी धाव नाकारली. मात्र, त्याच मिलरला अखेरचा चेंडू टोलवता आला नाही आणि अवघ्या एका धावेने 'दिल्ली' ने 'गुजरात 'विरुद्धची लढत गमावली. 'दिल्ली'ला विजयाच्या समीप घेऊन येणाऱ्या मिलरला शेवटच्या चेंडूवर जिंकून देण्याचा लढत अतिआत्मविश्वास भोवला.कर्णधार शुभमन गिल, जोस बटलर, वॉशिंग्टन सुंदर यांच्या आक्रमक अर्धशतकांच्या जोरावर 'गुजरात'ने ४ बाद २१० धावा केल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना चांगल्या सुरुवातीनंतर 'दिल्ली'चा डाव गडगडला. मात्र के. एल. राहुलने एका बाजूने झुंज दिली. जखमी होऊन निवृत्त झालेला डेव्हिड मिलर १७व्या षटकात पुन्हा मैदानात आला. मात्र, मोक्याच्या क्षणी राहुल बाद झाला.राहुलने ५२ चेंडूंत ११ चौकार व चार षटकारांसह ९२ धावा केल्या. यानंतर मिलरने फटकेबाजी करून 'दिल्ली'ला विजयाच्या समीप पोहोचविले. मात्र, त्याला 'फिनिशिंग टच' देण्यात अपयश आले. त्याने पाचव्या चेंडूवर कुलदीप यादवला धाव नाकारली. यानंतर त्याला प्रसिध कृष्णाचा अखेरचा चेंडू टोलवता आला नाही. चेंडू यष्टीरक्षक जोस बटलरच्या हातात विसावला. कुलदीपने धाव घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो धावबाद झाला. मिलरने २० चेंडूंत तीन चौकार व तीन षटकारांसह नाबाद ४१ धावा केल्या. 'दिल्ली'ला




८ बाद २०९ धावाच करता आल्या.दिल्ली संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. गुजरात संघाची निराशा निराशाजनक झाली. साई सुदर्शन बारा धावांवरच माघारी परतला. यानंतर गिल आणि जोस बटलरने डावाची सूत्रे हाती घेतली. या जोडीने 'गुजरात'ला पॉवरप्लेमध्ये १ बाद ६८ धावा अशी धावसंख्या रचून दिली बटलरने २७ चेंडूंत पाच षटकार आणि चार चौकारांसह ५२ धावा केल्या. या जोडीने ३२ चेंडूंत ६० धावा जोडल्या यानंतर गिलने वॉशिंग्टन सुंदरसह ६१ चेंडूंत १०४ धावांची भागीदारी रचली गिल ४५ चेंडूंत पाच षटकार व चाय चौकारांसह ७० धावांवर बाद झाला वॉशिंग्टन सुंदर अखेरच्या षटकात बाद झाला. त्याने ३२ चेंडूंत सहा चौकार व दोन षटकारांसह ५५ धावा केल्या.

## बाबर आझम चा कारनामा, ख्रिस गेलचा वर्ल्ड रेकॉर्ड ब्रेक नक्की काय केलं?

**मुंबई/वृत्तसंस्था**

बाबर आझम याने मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. बाबरने एका खेळीसह ख्रिस गेल, विराट कोहली यासारख्या फलंदाजांना मागे टाकलं आहे. बाबरने वर्ल्ड रेकॉर्ड मोडीत काढला आहे.जगातील सर्वात लोकप्रिय आणि श्रीमंत टी 20I लीग स्पर्धा अर्थात आयपीएलच्या 19 व्या मोसमाचा थरार सुरु आहे. या 19 व्या मोसमात गुरुवार 9 एप्रिल पर्यंत प्रत्येक संघाने किमान 2 सामने खेळले आहेत. या स्पर्धेत एकूण 10 संघांमध्ये एका ट्रॉफीसाठी चढाओढ पाहायला मिळत आहे. तर दुसऱ्या बाजूला पाकिस्तानमध्ये पीएसएल अर्थात पाकिस्तान सुपर लीग (PSL) स्पर्धा खेळवण्यात येत आहे. या स्पर्धेदरम्यान पाकिस्तानचा अनुभवी फलंदाज आणि माजी कर्णधार बाबर आझम याने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. बाबरने वर्ल्ड रेकॉर्ड ब्रेक केला आहे. बाबरने नक्की काय केलं? हे सविस्तर समजून घेऊयात. पेशावर जाल्मीने पीएसएल 2026 च्या 17 व्या सामन्यात कराची किंग्स विरुद्ध द्विशतक झळकावलं. बाबरच्या संघाला टॉस गमावून बॅटिंगसाठी भाग पाडण्यात आलं. मात्र बाबरच्या टीमने या संधीचा फायदा घेत 200 पार मजल मारली. बाबरच्या नेतृत्वात पेशावर जाल्मीने 20 षटकांत 3 विकेट्स गमावून 246 रन्स केल्या. बाबरने पेशावर जाल्मीसाठी 51 चेंडूत नाबाद 87 धावा केल्या. बाबरने या खेळीत 2 षटकार आणि 10 चौकार लगावले. बाबरने यासह टी 20 कारकीर्दीत 12 हजार धावांचा टप्पा गाठला. बाबर टी 20 क्रिकेटमध्ये वेगवान 12 हजार धावा करणारा पहिला फलंदाज ठरला. बाबरने 343 डावांत 12 हजार धावा पूर्ण करण्याची कामगिरी केली आणि ख्रिस गेल याचा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला.बाबरने ख्रिस गेल याच्या तुलनेत 5 डावांआधी 12 हजार टी 20 धावा पूर्ण केल्या. गेलने 343 डावांत 12 हजार धावांचा टप्पा गाठला होता. वेगवान 12 हजार करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत टीम इंडियाचा माजी फलंदाज विराट कोहली तिसऱ्या स्थानी आहे.

## राजस्थान रॉयल्स विजयी चौकारासाठी सज्ज, आरसीबीसमोर रोखण्याचं आव्हान

**गुवाहाटी/वृत्तसंस्था**

आयपीएल स्पर्धेच्या 19 व्या मोसमात (IPL 2026) शुक्रवारी 2 अजिंक्य संघ भिडणार आहेत. या सामन्यात राजस्थान रॉयल्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आमनेसामने असणार आहेत. गतविजेता आरसीबीने रजत पाटीदार याच्या नेतृत्वात या मोसमात सलग 2 सामने जिंकले आहेत. तर राजस्थाननेही जबरदस्त सुरुवात करत सलग आणि पहिल्या 3 सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. रियान पराग याच्या कॅप्टन्सीत राजस्थानने ही विजयी हॅट्रिक पूर्ण केली आहे. त्यामुळे शुक्रवारी 10 एप्रिलला राजस्थान आणि बंगळुरुपैकी कोणता संघ आपली विजयी घोडदौड कायम राखण्यात यशस्वी ठरतो हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. ताज्या आकडेवारीनुसार, राजस्थान रॉयल्स





पॉइंट्स टेबलमध्ये पहिल्या स्थानी विराजमान आहे. राजस्थानच्या खात्यात 6 गुण आहेत. तसेच राजस्थानचा नेट रनरेट हा +2.403 असा आहे. तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा नेट रनरेट हा राजस्थानपेक्षाही भारी आहे. आरसीबीचा नेट रनरेट हा +2.501 इतका आहे. राजस्थान रॉयल्सने 3 आयपीएल विजेत्या संघांना पराभूत केलंय. राजस्थानने चेन्नई सुपर किंग्स, गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स या 3 संघांना पराभूत केलं आहे. तर दुसऱ्या बाजूला बंगळुरुने सनरायजर्स हैदराबाद आणि चेन्नई सुपर किंग्सवर विजय मिळवला आहे.बंगळुरु विरुद्ध राजस्थान दोन्ही संघ गेल्या मोसमात (IPL 2025) एकूण 2 वेळा भिडले होते. बंगळुरुने गेल्या मोसमातील दोन्ही सामन्यात राजस्थानचा धुव्वा उडवला होता. बंगळुरुने गेल्या हंगामात राजस्थानवर 2 सामन्यांत 9 विकेट्स आणि 11 धावांनी विजय मिळवला होता. त्यामुळे राजस्थान यंदा बंगळुरुला पराभूत करुन गेल्या पराभवाची परतफेड करणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. आरसीबीचा अनुभवी फलंदाज विराट कोहली याने पहिल्या दोन्ही सामन्यांत जबरदस्त अशी कामगिरी केलीय. विराटने पहिल्या 2 सामन्यांत 1 अर्धशतकासह एकूण 97 धावा केल्या आहेत. त्यामुळे विराट राजस्थान विरुद्ध 'हल्ला बोल' करणार का? याकडे क्रिकेट चाहत्यांचं लक्ष असणार आहे.

तसेच बंगळुरुसमोर राजस्थानच्या सलामी जोडीला झटपट आऊट करण्याचा प्रयत्न असणार आहे. वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जैस्वाल या दोघांनीही पावसामुळे प्रभावित झालेल्या सामन्यात राजस्थानला मुंबई विरुद्ध 11 षटकांच्या सामन्यात 80 धावांची सलामी भागीदारी मिळवून दिली होती. त्यामुळे आरसीबी यशस्वी-वैभवला रोखण्यासाठी काय रणनिती अवलंबते हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

# लग्नासाठी मुसलमान झाली... वयाच्या 23 व्या वर्षी घेतला मोठा निर्णय... कसं आयुष्य जगतेय अभिनेत्री?

बॉलिवूडमध्ये असंख्य अभिनेत्रींनी पदार्पण केलं आणि स्वतःची ओळख भक्कम केली. पण चाहत्यांच्या मनावर आणि बॉलिवूडवर राज्य करणाऱ्या या अभिनेत्री अचानक गायब झाल्या... अशात अभिनेत्रींमधील एक अभिनेत्री तिने मॉडेलिंगमधून करियरची सुरुवात केली आणि त्यानंतर मोठ्या पडद्यावर स्वतः एक खास ओळख निर्माण केली. पण आता अभिनेत्री बॉलिवूडपासून दूर तिच्या वैवाहिक आयुष्यात आनंदी आहे. बॉलिवूडमध्ये करियर करत असताना तिच्या आयुष्यात एका मुस्लीम व्यक्तीची एन्ट्री झाली आणि त्याच्यासोबत लग्न करण्यासाठी अभिनेत्रीने देखील स्वतःच्या धर्माचा त्याग करत मुस्लीम धर्म स्वीकारला. सध्या ज्या अभिनेत्रीची चर्चा रंगली आहे, ती अभिनेत्री दुसरी तिसरी कोणी नसून टार्झन : द वंडर कार सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणारी अभिनेत्री आयेशा टाकिया आहे...





आयेशा हिने अवघ्या वयाच्या 13 व्या वर्षी करियरची सुरुवात केली. त्यानंतर तिने कधीच मागे वळून पाहिलं नाही... अनेक जाहिरातींमध्ये देखील तिने बालकलाकार म्हणून काम केलं आहे.त्यानंतर आयेशा हिने मॉडेलिंगची सुरुवात केली. आयेशा पहिल्यांदा बालकलाकार म्हणून अभिनेता शाहिद कपूरसोबत 'कम्प्लेन'च्या जाहिरातीत दिसली होती. तिने डिस्ने चॅनलसाठी देखील काम केलं आहे, जिथे तिला महिन्याला 8 हजार रुपये मानधन मिळत होतं... आज अभिनेत्री रॉयल आयुष्य जगत आहे.त्यानंतर 2000 मध्ये आयेशा हिने गायक फाल्गुनी पाठत यांच्या 'मेरी चुनर उड उड जाए' गाण्यासाठी काम केलं... त्यानंतर आयेशा हिने कधीच मागे वळून पाहिलं नाही... अखेर आयेशा हिला बॉलिवूडमधून देखील ऑफर मिळण्यास सुरुवात झालेली.2004 मध्ये आयेशा हिने अब्बास-मस्तान दिग्दर्शित 'टार्जनः द वंडर कार' सिनेमात महत्त्वाची भूमिका साकारली. सिनेमा बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. पण आयेशा हिच्या अभिनयाचं कौतुक झालं... तिला बेस्ट फीमेल डेब्यू या पुरस्काराने देखील गौकविण्यात आलं... त्यानंतर 2009 मध्ये प्रदर्शित झालेल्या 'वॉन्टेड' सिनेमातून अभिनेत्रीने चाहत्यांच्या मनावर राज्य केलं. सिनेमाने बॉक्स ऑफिसवर देखील बक्कळ कमाई केली. दोन वर्षांनंतर, 2011 साली आलेल्या 'मोड' सिनेमानंतर आयेशाने अचानक इंडस्ट्री सोडली.

आयेशा टाकिया 'दिल मांगे मोर', 'सोचा ना था', 'शादी नं. 1', 'डोर' आणि सलमान खानसोबत 'वॉन्टेड' यांसारख्या सिनेमांमध्येही दिसली. 2009 मध्ये, तिने राजकारणी अबू आझमी यांचा मुलगा फरहान आझमी याच्याशी लग्न केले. या लग्नासाठी तिने इस्लाम धर्म स्वीकारला आणि सिनेमामधून ब्रेक घेतला. त्यांना मिकायल नावाचा एक मुलगा आहे. आयेशा आज तिच्या वैवाहिक आयुष्यात आनंदी आहे.

## राखी सावंतच्या लव्ह अँगलबद्दल स्पष्टच बोलला सागर कारंडे


बिग बॉस मराठीचं सहावं पर्व आता अंतिम टप्प्यात आलंय. बिग बॉसमधून सागर कारंडेची नुकतीच एक्झिट झाली. त्यामुळे आता बिग बॉसच्या घरात राकेश बापट, राखी सावंत , दीपाली सय्यद, अनुश्री माने, तन्वी कोलते, रेवा कौरासे आणि विशाल कोटियन हे सदस्य उरले आहेत. बिग बॉसच्या घरात राखी सावंतचा राडा रोजच पाहायला मिळतो. कोणत्या ना कोणत्या कारणावरून ती सदस्यांमध्ये आग लावण्याचा प्रयत्न करते. त्याचबरोबर तिनं राकेशसोबत लव्ह अँगल करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, राकेशनं तिला मी तुला मैत्रीण मानतो, असं सांगितलं. अशातच आता सागर कारंडेनं नुकत्याच एका मुलाखतीमध्ये राखी सावंतबद्दल भाष्य केलं आहे.राखी सावंत, दीपालीला राकेशच्या नावानं डिवचत असते. दीपाली आणि राकेशमध्ये चांगली मैत्री असून राखीला त्यांची मैत्री खटकते. यावरून बिग बॉसच्या घरात असताना सागरनेही राखीला समजावलेलं. आता बिग बॉसच्या बाहेर येताच सागर कारंडे म्हणाला की, 'राखीचं नातं हे गेमसाठी आहे. मला माहित आहे की, ती सगळं गेमसाठी



करतेय. मला वाटतं की ते गेमसाठीच आहे. खऱ्या भावना असतील तर उत्तम आहे. ती रडली आहे, खूप वेळा भावूक झाली आहे. मला त्या-त्या वेळी वाटलं होतं की, राकेशबद्दल तिच्या मनात भावना आहेत.'पण, का कोणास ठाऊक, त्यावर विश्वास ठेवावासा वाटत नाही. लांडगा आला रे आला म्हणतो ना, की खरोखरचा लांडगा येईल, तेव्हा कोणी विश्वास ठेवणार नाही. राखीचं ते झालेलं आहे. खरंच ती भावूक झाली असावी. त्याच्याबरोबर ती जोडली गेली असावी. पण मला ते खोटं वाटतंय. ती गेमसाठी काहीही करू शकते, याची मला खात्री आहे. बिग बॉससाठी ती काहीही करू शकते.' असं सागरने पुढे सांगितलं.दरम्यान, बिग बॉसमध्ये 'तिकीट टू फिनाले' या टास्कमध्ये तन्वी कोलते जिंकली असून ती फिनालेमध्ये जाणारी पहिली स्पर्धक ठरली आहे.

## अभिनेत्रीचा 14 वर्षांचा संसार मोडला; पतीचे 2-4 नाही तर 9 महिलांसोबत अनैतिक संबंध उघड

फिल्म इंडस्ट्री लांबून अत्यंत झगमगणारी दिसते. पडद्यावर जे कलाकार चेहऱ्यावर हास्य आणून प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहेत, त्यांचं वैयक्तिक आयुष्यातही सुख-समाधानाने समृद्ध असले, असं अनेकांना वाटतं. परंतु इंडस्ट्रीत असेही अनेक स्टार्स आहेत, ज्यांना त्यांच्या खासगी आयुष्यात बऱ्याच समस्यांचा सामना करावा लागला आहे. चित्रपटांमध्ये, मालिकांमध्ये अनेकदा फसवणूक, एक्स्ट्रा मॅरिटल अफेअर यांसारख्या कथा आपण नेहमीच पाहतो, परंतु एका प्रसिद्ध अभिनेत्रीच्या खऱ्या आयुष्यात हे सर्व घडल्याचं समोर आलं आहे. या अभिनेत्रीचं नाव आहे पूजिता जोन्नालगड्डा. पूजिताने तेलुगू, तमिळ, मल्याळम आणि कन्नड भाषांमध्ये जवळपास 130 चित्रपटांमध्ये काम केलं. फक्त तेलुगू भाषेतच तिने 70 हून अधिक चित्रपट केले आहेत. परंतु करिअरमधील हे यश तिला तिच्या खासगी आयुष्यात मन:शांती देऊ शकलं नाही.पूजिताने पडद्यावर अनेकदा दुसऱ्या पत्नीची भूमिका साकारली होती, परंतु खऱ्या आयुष्यातसुद्धा तिला अशाच परिस्थितीचा सामना करावा लागेल, याची तिला पुसटशीही कल्पना नव्हती. तिने विजय गोपालशी लग्न केलं होतं. लग्नाच्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये सर्वकाही चांगलं होतं. या दोघांना एक मुलगा आहे. परंतु हा आनंद फार काळ टिकला नाही. पूजिताने तिच्या पतीवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. पती विजय गोपालचे दोन-तीन नव्हे तर नऊ वेगवेगळ्या महिलांसोबत अनैतिक संबंध होते, असा धक्कादायक आरोप पूजिताने केला.ज्या व्यक्तीसोबत ती 14 वर्षांपासून होती, तीच व्यक्ती तिच्या नकळत फसवणूक करत होती. मुलगा जेव्हा 7 वर्षांचा होता, तेव्हाच



विजय तिला सोडून गेला, असं तिने सांगितलं. विजय गोपालने दुसरं लग्न केलं. हे प्रकरण फक्त फसवणुकीपर्यंत मर्यादित नव्हतं, तर पूजिताने विजयवर आर्थिक शोषणाचाही आरोप केला आहे. विजयने तिच्या घरातून जवळपास 2.5 कोटी रुपयांचे सोन्याचे दागिने चोरले, असा आरोप तिने केला. पतीचे हे कारनामे उघड झाल्यानंतर पूजिता एकटीच तिच्या मुलाचा सांभाळ करतेय. तिची ही मुलाखत व्हायरल झाली असून त्यावर नेटकऱ्यांनी विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत.

# बदनामीच्या भीतीने गायकाने स्वत:च्या गाण्याला दिलं नाही नाव, पण रिलीज होताच ठरलं सुपरहिट, आजही गाणं प्रचंड हिट

भारतीय चित्रपटसृष्टीत काही कलाकार असे आहेत जे आपल्या वेगळ्या शैलीमुळे खास ओळख निर्माण करतात. अशाच नावांपैकी एक म्हणजे अमित त्रिवेदी. त्यांच्या संगीतामध्ये नेहमीच काहीतरी नवीन, प्रयोगशील आणि मनाला भिडणारा सूर असतो. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक गाजलेली गाणी दिली असून आजही ते प्रेक्षकांच्या ओठांवर आहेत. मात्र, त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा टर्निंग पॉइंट ठरला तो 'देव डी' या चित्रपटामुळे.8 एप्रिल 1979 रोजी मुंबईत एका गुजराती कुटुंबात अमित त्रिवेदी यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ गाव गुजरातमधील अहमदाबाद आहे. लहानपणापासूनच त्यांच्या घरात भक्तीगीतं आणि लोकसंगीत यांचा माहोल होता. याच वातावरणाचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. शालेय जीवनातच त्यांना विविध वाद्यांबद्दल आवड निर्माण झाली आणि पुढे जाऊन त्यांनी संगीत क्षेत्रातच करिअर करायचे ठरवले.कॉलेजमध्ये असताना त्यांनी मित्रांसोबत 'ओम' नावाचा बँड स्थापन केला. या बँडच्या माध्यमातून त्यांनी छोटे-मोठे कार्यक्रम आणि लाईव्ह परफॉर्मन्स केले. सुरुवातीला त्यांना फारशी ओळख मिळाली



नाही पण त्यांनी हार मानली नाही. सातत्याने प्रयत्न करत त्यांनी संगीत क्षेत्रात स्वतःची जागा निर्माण करण्यासाठी मेहनत घेतली. चित्रपटसृष्टीत येण्यापूर्वी त्यांनी थिएटर, टीव्ही शो आणि जाहिरातींसाठी संगीत दिले. अनेक कंपन्यांसाठी जिंगल्स तयार करत त्यांनी अनुभव मिळवला. हा काळ त्यांच्या शिकण्याचा होता, ज्यामध्ये त्यांनी संगीताच्या सूक्ष्म गोष्टी आत्मसात केल्या.

2008 साली 'आमिर' या चित्रपटातून त्यांनी संगीतकार म्हणून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटातील संगीताचे कौतुक झाले. त्यानंतर त्यांची भेट दिग्दर्शक अनुराग कश्यप यांच्याशी झाली आणि त्यांनी अमित त्रिवेदी यांना देव डी मध्ये संधी दिली. 'इमोशनल अत्याचार' हे गाणे स्वतः अमित त्रिवेदी आणि अमिताभ भट्टाचार्य यांनी गायले होते, मात्र सुरुवातीला त्यांनी आपले नाव क्रेडिटमध्ये दिले नव्हते. गाणे फ्लॉप झाले तर करिअरवर परिणाम होईल, या भीतीने त्यांनी हे पाऊल उचलले होते. पण गाणे सुपरहिट ठरले आणि जवळपास 9 वर्षांनी हा खुलासा करण्यात आला. 'देव डी'नंतर अमित त्रिवेदी यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. त्यांनी उडान, क्वीन, लुटेरा, इश्कजादे आणि उडता पंजाब यांसारख्या अनेक चित्रपटांना संगीत दिले. प्रत्येक चित्रपटात काहीतरी वेगळे करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येतो.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# डिजिटल जनगणना २०२७ च्या तयारीला वेग; जिल्हास्तरीय क्षेत्रीय प्रशिक्षण संपन्न

## जनगणनेचे कार्य अचूकपणे पूर्ण करा- डॉ. प्रवीणकुमार देवरे

जनसंचलन/ बुलढाणा

जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात प्रशासकीय तयारीने वेग घेतला आहे. यावेळची जनगणना पूर्णपणे कागदविरहित आणि डिजिटल पद्धतीने पार पडणार असून, ही माहिती भविष्यातील भारताची अर्थव्यवस्था बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. त्यामुळे नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाद्वारे तांत्रिक बाबी सखोल समजून घेऊन जनगणनेचे कार्य अचूकपणे पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी दिले. जिल्हा नियोजन सभागृह आणि जिजाऊ सभागृह येथे जिल्हास्तरीय क्षेत्रीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण दोन बॅचेसमध्ये आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाचा समारोप ८ एप्रिल रोजी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या उपस्थितीत झाला, यावेळी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनीही प्रशिक्षणास उपस्थित राहून मार्गदर्शन केले. जनगणनेचे काम करताना कोणतीही त्रुटी राहू नये आणि प्रक्रियेत पारदर्शकता राखली जावी, यावर त्यांनी विशेष भर दिला. कर्मचाऱ्यांनी डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करावा, डेटा संकलनाची पद्धत नीट समजून घ्यावी आणि फिल्डवर काम करताना येणाऱ्या अडचणींवर तात्काळ उपाययोजना कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले. या मोहिमेअंतर्गत ८१ फिल्ड ट्रेनर्सना चार मास्टर ट्रेनर्समार्फत प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान प्रत्यक्ष कामाचा अनुभव येण्यासाठी ग्रामीण भागातील येळगाव ता. जि. बुलढाणा व शहरी भागातील बुलढाणा येथील राम नगर या भागात काही घरांना भेटी देऊन प्रत्यक्ष जनगणनेची प्रात्यक्षिके करून दाखवण्यात आली. यावेळी जनगणना संचालनालयाचे पवन घोडे व मयूर पवार (सांख्यिकी अन्वेषक ग्रेड ), मास्टर ट्रेनर संजय खडसे उपविभागीय अधिकारी, सिंदखेड राजा आणि डॉ. रामेश्वर पुरी उपविभागीय अधिकारी, खामगाव यांच्यासह सर्व क्षेत्रीय प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी सुरेश कव्हळे, तहसीलदार संजीवणी मुपडे, आणि नायब तहसीलदार प्रमोद करे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वांनी समन्वयाने आणि जबाबदारीने हे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# अमृत कडून राज्यव्यापी परिवार सर्वेक्षण मोहिम; ८ ते २५ एप्रिलदरम्यान

जनसंचलन/ बुलढाणा

महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्याकडून राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ८ ते २५ एप्रिल या कालावधीत राज्यव्यापी परिवार सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी दिली. राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये हे सर्वेक्षण राबविण्यात येणार असून, लक्षित गटातील कुटुंबांची अचूक संख्या निश्चित करणे, त्यांच्या गरजा व अपेक्षा जाणून घेणे तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नव्या योजना तयार करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना स्वतंत्र शासकीय विभाग, संस्था किंवा महामंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा घटकांच्या उन्नतीसाठी अमृत संस्था कार्यरत आहे. सध्या या सर्वेक्षणात ब्राह्मण, सिंधी, हिंदू मारवाडी, गुजराती, पटेल, राजपूत, राजपुरोहित, हिंदू नेपाळी, बनिया, कम्मा, कायस्थ, अय्यंगार, नायर, नायडू, पाटीदार, बंगाली, भूमिहार, येलमार, ठाकूर, त्यागी, सेनगूनथर, जाट, कानबी, कोमटी आणि वैश्य अशा सुमारे २५ जातींचा समावेश आहे. सर्वेक्षणानंतर या यादीत आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या घटकांतील युवक-युवतींसाठी व्यक्तिमत्त्व विकास, औद्योगिक व प्रगत कौशल्य प्रशिक्षण, रोजगारक्षम कौशल्य विकास, उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसाहाय्य, स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन तसेच उद्योग-व्यवसाय वृद्धीसाठी वैयक्तिक व्याज परतावा अशा विविध योजना सध्या राबविल्या जात आहेत. भविष्यात या योजनांची व्याप्ती वाढवून अधिक परिणामकारक व मूल्यवर्धित योजना तयार करण्यासाठी हे सर्वेक्षण महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे पात्र नागरिकांनी मोठ्या संख्येने या नोंदणी मोहिमेत सहभागी होऊन शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हा व्यवस्थापक जिग्नेश कमानी यांनी केले आहे.

# शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत क्रीडा प्रबोधिनींसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु

जनसंचलन/ बुलढाणा

राज्यात गुणवंत खेळाडू घडविण्यासाठी शिवछत्रपती क्रीडापीठ, पुणे अंतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनी केंद्रांमध्ये सन २०२६-२७ या वर्षासाठी १९ वर्षांखालील खेळाडूंच्या निवडीची प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. सरळ प्रवेश तसेच खेळनिहाय कौशल्य चाचणीद्वारे निवासी प्रवेश दिला जाणार आहे. राज्यातील अमरावती, नागपूर, अकोला, गडचिरोली, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद आणि पुणे येथे क्रीडा प्रबोधिनी केंद्रे कार्यरत असून, नव्या प्रशिक्षणार्थींची निवड प्रस्तावित आहे. या प्रबोधिनींमध्ये आर्चरी, ज्युदो, हॅण्डबॉल, ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, बॅडमिंटन, शूटिंग, कुस्ती, हॉकी, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, जिम्नॅस्टिक्स, जलतरण, फुटबॉल, ट्रायथलॉन व सायकलिंग अशा एकूण १६ क्रीडा प्रकारांमध्ये प्रशिक्षण दिले जाते. क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळ राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू तसेच राष्ट्रीय स्तरावरील सहभागी खेळाडूंची तज्ज्ञ समितीद्वारे चाचणी घेऊन पात्र खेळाडूंची निवड केली जाणार आहे. वैद्यकीय चाचणीमध्ये निवड झालेल्या शारीरिक दृष्ट्या सुदृढ खेळाडूंची निवड करण्यात येईल. क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी अर्जदार हा १९ वर्षाखालील तसेच महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असणे अनिवार्य आहे. क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी खेळाडूकडे राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागी स्पर्धेतील प्रमाणपत्रे, आधारकार्ड तसेच नगरपालिका / ग्रामपंचायत यांनी



दिलेले जन्म प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. पात्र खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागी स्पर्धेतील प्रमाणपत्रे, आधारकार्ड तसेच नगरपालिका/ ग्रामपंचायत यांनी दिलेले जन्म प्रमाणपत्र जोडून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणा येथे दि.२४ एप्रिल २०२६ पुर्वी सादर करावे. सदर अर्जात खेळाडूचा संपर्क क्रमांक, पुर्ण पत्ता, ई-मेल आयडी नमुद करावा. विभागस्तरावर चाचण्यांचे आयोजन दि. २७ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत विभाग स्तरावर होणार आहे. तरी बुलडाणा जिल्ह्यातील पात्र संबंधीत खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरुन रोड, बुलडाणा येथुन अर्ज प्राप्त करुन आवश्यक कागदपत्रासह दि.२४ एप्रिल २०२६ पर्यंत सादर करावे. तसेच अधिक माहितीकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

# गो. से. महाविद्यालयात रसायनशास्त्र विषयाचे आंतरमहाविद्यालयीन सेमिनार स्पर्धेचे यशस्वी आयोजन

जनसंचलन/ खामगाव

विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळद्वारा संचालित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव तसेच अमरावती युनिव्हर्सिटी केमिस्ट्री टीचर्स असोसिएशन () यांच्या संयुक्त विद्यमाने एम.एस्सी. द्वितीय वर्ष (सेमिस्टर ) च्या विद्यार्थ्यांसाठी रसायनशास्त्र विषयाचे युनिव्हर्सिटी लेव्हल इंटरकॉलेजिएट सेमिनार स्पर्धेचे यशस्वी आयोजन दिनांक ४ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आले. स्पर्धेचा विषय असून या स्पर्धेकरिता परीक्षक म्हणून डॉ. निलेश पडोळे, विनायक विज्ञान महविद्यालय नांदगाव खंडेश्वर व डॉ संजय खोब्रागडे, ब्रिजलाल बियाणी महविद्यालय, अमरावती यांनी आपल्या सेवा प्रदान केली. स्पर्धेकरिता विद्यापीठ क्षेत्रातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. ही स्पर्धा महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागामार्फत अत्यंत सुयोग्य पद्धतीने पार पाडण्यात आली. स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. समारोपीय कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. एस. जे. पाटील, उपाध्यक्ष, व प्रा. डॉ. के. एन. पुरी, सचिव, , तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. धनंजय तळवणकर, प्राचार्य गो. से. महाविद्यालय खामगाव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या स्पर्धेला लाभलेले प्रा. निलेश पडोळे, व डॉ. एस. जी.खोब्रागडे यांनी अत्यंत सुलभपणे व बारकाईने स्पर्धकांचे परीक्षण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. हेमंत चांडक यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी रसायनशास्त्र विभागातील विविध नेट सेट परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले व रसायनशास्त्र प्रयोगशाळा याबद्दल विशेष माहिती सांगितली तसेच आलेल्या सर्व पाहुण्यांचा परिचय त्यांनी आपल्या संभाषणातून करून दिला. कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले प्रा. डॉ. एस. जी. पाटील यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या स्पर्धेमध्ये विध्यार्थ्यांचा उस्फुर्त असा प्रतिसाद लाभला. या सेमिनार स्पर्धेत प्रथम क्रमांक कपिल इंगोले, विद्याभारती महाविद्यालय अमरावती यांनी पटकावला,त्यांना रोख पारितोषिक रु.२०००/- ,मोमेंटो व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# कॅम्ब्रिज कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठ परीक्षेत घवघवीत यश



जनसंचलन/बुलढाणा

नुकत्याच जाहीर झालेल्या विद्यापीठ परिक्षेत बी. फार्मसी तृतीय सेमिस्टर च्या निकालात स्व. रामभाऊजी लिंगाडे प्रतिष्ठान संचालित कॅम्ब्रिज कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे. कॉलेज चा निकाल उच्चांकी लागला असून अनेक विद्यार्थ्यांनी सुवर्ण अक्षरात आपली नावे कोरली आहे. फार्मसी शिक्षण क्षेत्रात अल्पावधीतच आपले वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या कॅम्ब्रिज कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी केवळ उत्तीर्णच नव्हे तर गुणवत्ता यादीत सुद्धा नाव मिळविले आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्रशासनाने आनंद व्यक्त केला. परीक्षेतील या सुयशामुळे विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे अथक परिश्रम, प्राध्यपकांचे दर्जेदार मार्गदर्शन आणि महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या अत्याधुनिक सोयीसुविधांचा मोठा वाट आहे. परिक्षेमध्ये प्रथम स्थानावर मिस वैष्णवी खान्देशराड ( ८.३९), द्वितीय स्थानावर स्वाती गायकवाड ( ८.३०) असून मिस अदिती बोरुल ( ८.२५) हिने तिसरे स्थान पटकावले आहे तसेच चेतन चव्हाण ( ८.१२) हा चौथ्या स्थानावर असून मिस दिपाली कानडजे ( ८.०६) हिने पाचवे स्थान पटकावले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुशिलकुमार शिंदे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संस्थेचे अध्यक्ष माननीय पदवीधर आमदार श्री धीरजभाऊ लिंगाडे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिला आहे. व आमच्या विद्यार्थ्यांचे हे यश म्हणजे त्यांनी केलेल्या कष्टाचे आणि आमच्या संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेचे फळ आहे अशा भावना व्यक्त केल्या

# जिल्हा रुग्णालय बुलढाणा येथे जागतिक होमिओपॅथी दिवस उत्साहात साजरा

जनसंचलन/बुलढाणा

होमिओपॅथीचे जनक सर सॅम्युएल हॅनेमन यांच्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, बुलढाणा जिल्हा रुग्णालय येथे जागतिक होमिओपॅथी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ङ्कशाश्वत आरोग्यासाठी होमिओपॅथी या संकल्पनेवर () आधारित या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी तर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल राम गिते हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. दत्तात्रय बिराजदार म्हणाले की, केंद्रीय आयुष तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापरावजी जाधव यांच्या खंबीर नेतृत्वात जिल्ह्यात आयुष मंत्रालयामार्फत सामान्य नागरिकांसाठी अनेकविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. होमिओपॅथीसह आयुषच्या इतर सर्व चिकित्सा पद्धतींचा लाभ तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. भविष्यात जिल्ह्यात आयुष विभागामार्फत येणाऱ्या विविध अद्ययावत सेवा-सुविधांची सविस्तर माहितीही त्यांनी यावेळी दिली. कार्यक्रमात डॉ. स्वाती धारस्कर यांनी होमिओपॅथी चिकित्सा पद्धतीचे मानवी आरोग्यावरील सकारात्मक परिणाम आणि या उपचार पद्धतीचे महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला जिल्हा आयुष अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण घोंगटे, अधिसेविका श्रीमती कुलकर्णी, आयुष सल्लागार डॉ. मोहम्मद शफाअत, वैद्यकीय अधिकारी डॉ. सय्यद अरशद, डॉ. शीतल ठाकरे, डॉ. कमर खान, औषध निर्माण अधिकारी रेखा भुसारी शिंदे यांच्यासह जिल्हा रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत तांगडे यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. पंकज राठोड यांनी केले. उपस्थितांचे आभार वैभव उबरहंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शांता अंभोरे, सौरभ कुलकर्णी व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी सक्षम यंत्रणा कार्यान्वित करा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

वृत्तसंस्था/मुंबई

मुंबईमध्ये नोकरी, व्यवसाय निमित्ताने बाहेरून मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. त्यांच्याकरिता मोठ्या प्रमाणावर घरांची आवश्यकता असल्याने भाडेतत्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी सक्षम यंत्रणा उभारून कार्यान्वित करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी नागरिकांच्या सुविधांकरिता पोर्टल विकसित करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबईसह अन्य महानगरांमध्ये नोकरी, व्यवसायनिमित्त आलेल्या नागरिकांसाठी परवडणाऱ्या दरात भाडेतत्त्वावरील घरे असली पाहिजेत. मागणीनुसार पुरवठा या तत्त्वावर भाडेतत्त्वाने घरे उपलब्ध होतील, याची काळजी घेण्यात यावी. घरांसाठी मागण्यांसंदर्भातील करारानुसार सर्व कार्यवाही होईल, याबाबतही यंत्रणेने दक्षता घेतली पाहिजे. उपलब्ध असलेल्या भाडेतत्त्वावरील घरांबाबत यंत्रणेने समन्वयाने कार्यवाही केल्यास मालक व भाडेकरू या दोघांनाही अडचण येणार नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ अंमलबजावणीच्या सक्षमीकरण व सुलभी करणाबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या कायद्याअंतर्गत सक्षम प्राधिकारी म्हणून पोलीस उपायुक्त यांना नियुक्त करावे. पोलीस स्टेशन अथवा पोलिसांचे परिक्षेत्र वाढल्यास त्यानुसार आपोआप सक्षम अधिकारी वाढतील, अशी व्यवस्था करावी. पोलीस उपायुक्तांच्या कामकाज यादीमध्ये सक्षम प्राधिकारी म्हणून काम पाहण्याच्या कामकाजाचा समावेश करण्यासाठी अधिसूचना काढण्याची कार्यवाही करावी. भाडेदर संदर्भातील न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्यासाठी १०० विशेष न्यायालये स्थापन करावी. यासाठी सेवानिवृत्त



न्यायाधीशांची नियुक्ती करावी. न्यायालयाच्या परवानगीने भाडेदर संदर्भातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी सायंकाळचे न्यायालय सुरू करावे या न्यायालयांसाठी जागा नसल्यास भाडेतत्त्वावर जागा घेण्यात याव्यात. यामुळे वर्षानुवर्ष प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली निघतील, असा विश्वास यावेळी मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. बैठकीस गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, पोलीस आयुक्त देवेन भारती, गृह विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, राधिका रस्तोगी, विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल आदी उपस्थित होते.

# माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा उत्साहात संपन्न

जनसंचलन/बुलढाणा

माझे गाव आरोग्य संपन्न गावफ्र अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा व आढावा सभा येथील वैद्यकीय महाविद्यालयात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. बैठकीत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्य योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे, नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती वाढविणे तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर विशेष भर देण्यात आला. जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव यांनी आरसीएच कार्यक्रमांतर्गत एचपीव्ही () लसीकरणाचा तालुकानिहाय आढावा घेत उद्दिष्टपूर्तीसाठी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. तर जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे यांनी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाचा आढावा घेत संबंधित कामकाजाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी रणजीत मंडले यांनी विविध आरोग्य कार्यक्रम व जनजागृती उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागात सोशल मीडिया, स्थानिक माध्यमे, वृत्तपत्रे आणि यशोगाथांचा प्रभावी वापर करण्यावर विशेष भर देण्यात आला. तसेच कमी प्रगती असलेल्या कार्यक्रमांमध्ये सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. डब्ल्यूएचओचे डॉ. सम्यक खौरे यांनी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शन केले. बैठकीत तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी अभियानाशी संबंधित कामकाजाबाबत सादरीकरण केले. या प्रसंगी सर्व तालुका आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी, जिल्हा हिवताप अधिकारी शिवराज चौहान, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी धुतडमल, अनिल लोखंडे व सुनील लोखंडे उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८